**महाराष्ट्र राज्य जनजाती सल्लागार परिषदेची मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली सहयाद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई येथे शुक्रवार, दिनांक १४/०२/२०१४ रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित केलेल्या ४८ व्या बैठकीचे इतिवृत्त.**

सदर बैठकीत मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, केंद्रिय राज्यमंत्री सामाजिक न्याय. विधानसभा उपाध्यक्ष, मा.मंत्री गृह विभाग, मा. मंत्री आदिवासी विकास, मा.मंत्री सामाजिक न्याय, मा.मंत्री वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये, मा.मंत्री सार्वजनिक आरोग्य, मा.मंत्री महिला व बाल विकास, मा.मंत्री क्रीडा व युवक कल्याण, ,मा.राज्यमंत्री आदिवासी विकास विशेष निमंत्रित संसद सदस्य, जनजाती सल्लागार परिषदेवरील विधानसभा सदस्य, मा.मुख्य सचिव, मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव आणि इतर अन्य मान्यवर उपस्थित होते.

बैठकीच्या सुरुवातीस मा.प्रधान सचिव (आ.वि.) यांनी आदिवासी विकासाच्या बाबींबाबत सादरीकरण (Power Point Presentation) केले. आदिवासी विकास उपयोजनेखालील गेल्या १० वर्षात घेतलेल्या विविध उपक्रमांमुळे विकास निर्देशांकांत भरीव सुधारणा झालेली आहे. तसेच या पुढे आदिवासी क्षेत्रात कार्यरत यंत्रणेच्या कामगिरीत असलेल्या उणीवा दुर करण्यावर आदिवासी विकास विभागाने भर देण्याची गरज असल्याचे सादरीकरणात निष्कर्ष नोंदविण्यात आले.

त्यानंतर मा.मंत्री (आ.वि.) यांनी जनजाती सल्लागार परिषदेच्या ४७ व्या बैठकीच्या इतिवृत्तावर करण्यात आलेल्या कार्यवाहीची/सद्यस्थितीची माहिती दिली. त्याला बैठकीत मान्यता देण्यात आली, व त्यानंतर ४८ व्या बैठकीतील विषयांवर सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

## भाग : १

### जनजाती सल्लागार परिषदेच्या ४८ व्या बैठकीत समावेश करण्यासाठी मा.राज्यपाल महोदय यांनी सुचविलेले विषय

| अ.क्र. | विषय | संबंधीत विभाग | घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|---|
| १ | जनजाती सल्लागार समितीने आदिवासींच्या स्थलांतरणांची कारणे तसेच स्थलांतरणामुळे त्यांच्या आरोग्य, शिक्षण, सामाजिक व आर्थिक परिस्थितीवर होणारा परिणाम, याचे पुर्नविलोकन करावे व ते रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजनेबाबत सल्ला द्यावा. | नियोजन विभाग (रोजगार हमी योजना) / आदिवासी विकास विभाग / महिला व बाल विकास | (अ) नियोजन विभाग (रोजगार हमी योजना) यांचेमार्फत ग्रुप-ग्रामपंचायती करिता पाच कामांची मर्यादा घातलेली आहे. आदिवासी भागात कामाची असलेली गरज आणि मजुरांची मुबलक प्रमाणात उपलब्धता विचारात घेता पाच कामांची मर्यादा ठेवायची असल्यास ती प्रत्येक गावनिहाय करावी. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | विभाग / अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग | (ब) वैयक्तिक स्वरुपाच्या रोजगाराची कामे जास्त प्रमाणात हाती घ्यावी. उदा. जमीन सपाटीकरण, जवाहर विहीरी योजना, फळझाडे योजना इ.<br><br>(क) वनकामे संयुक्त वन व्यवस्थापन समितीमार्फत राबवाविण्यात यावीत.<br><br>(ड) मजुरांना मजुरी धनादेशाद्वारे देण्यात येते. दुर्गम भागामध्ये बँकेची सुविधा कमी प्रमाणात असल्यामुळे बँकेला पुरक तत्सम व्यवस्था उदा. बँक करस्पॉडन्ट (Bank Correspondent) विशेष सहाय्य विभागाच्या कार्यक्रमाच्या धरतीवर विचारात घ्यावे.<br><br>(इ) आदिवासी क्षेत्रातील दुर्गम भागात स्वस्त धान्य दुकाने चालविणे सर्व दृष्टीने सोयीचे नसतात. ती दुकाने उघडली जावी म्हणुन धान्य पुरवठा करण्याकरिता दुकानदारांना जे कमिशन दिले जाते, त्यामध्ये अधिक कमिशन देण्याबाबत अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने कार्यवाही करावी. तसेच द्वार - वितरण योजना (Mobile FPS) प्रत्येक दुर्गम भागात सुरु करावी.<br><br>(फ) राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत प्राधान्य कुटुंबांची निवड करण्यासाठी राज्यातील एकुण लोकसंख्येपैकी ग्रामीण भागातील ७६.३२ % कुटुंबे निवडावयाचे आहेत. आदिवासी भागाच्या जिल्हयातील दारिद्रय रेषेखालील (बीपीएल) कुटुंबांची संख्या कमाल मर्यादेपेक्षा (ceiling limit) जास्त आहे. दारिद्रयरेषेखालील |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | आदिवासी कुटुंबे या योजनेपासुन वंचित राहु नये. याकरिता सदरहु मर्यादा आदिवासी उपयोजना क्षेत्राकरिता लागु करण्यात येऊ नये.<br><br>(ग) बायफ विकास अनुसंधान प्रतिष्ठान, पुणे आणि तत्सम संस्थेमार्फत वाडी विकास कार्यक्रम उपयोगी ठरेल. |
| २ | जनजाती सल्लागार समितीने PESA व FRA च्या अंमलबजावणीच्या सद्यस्थितीचे पुनर्विलोकन करावे व सदर कायद्यांची सर्वंकष अंमलबजावणी होण्यासाठी, राज्यातील अस्तित्वात असलेल्या कायद्यांशी सदर कायदे विसंगत असल्यास, ती विसंगती दूर करण्याकरिता उपाययोजना व पेसा कायद्यांतर्गत करावयाचे नियम सुचवावेत. | ग्राम विकास विभाग / आदिवासी विकास विभाग | (अ) ग्राम विकास विभागाने PESA बाबतची नियमावली प्रसिध्द केली आहे, यामध्ये आलेली सुचना विचारार्थ घेवून लवकरात लवकर नियमावली लागू करावी.<br><br>(ब) पेसा कायद्यांतर्गत ग्रामसभेची क्षमता वाढविणे आवश्यक आहे. यासाठी ग्रामविकास विभागाने एक कालबध्द कार्यक्रम आखुन राजीव गांधी पंचायत सक्षमीकरण अभियान (RGPSA) अंतर्गत किमान क्षमता निर्मिती करण्यासाठी एक मोहिम राबवावी.<br><br>(क) महाराष्ट्र राज्याने वन हक्क कायद्याची (FRA) केलेली अंमलबजावणी व इतर राज्यांनी केलेली अंमलबजावणी यांची तुलना करुन त्याबाबतचा विश्लेषणात्मक अहवाल तयार करावा.<br><br>(ड) वन हक्क कायद्यांतर्गत (FRA) वैयक्तिक व सामुदायिकरित्या जमिनीचे पट्टे मिळालेल्या आदिवासींचे उत्पन्न वाढविण्यासाठी जमिनीचे सपाटीकरण करणे, विहीरी खोदणे, पाईप लाईन देणे, |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | विद्युत पंप पुरविणे इ. प्रकारच्या योजना राबविण्याची एक वेगळी योजना तयार करावी. |
| ३ | आदिवासींमधील कुपोषणाची समस्या हाताळण्याकरिता राज्य शासनामार्फत करण्यात येणाऱ्या उपाययोजनेचे जनजाती सल्लागार समितीने पुर्नविलोकन करावे. तसेच बालमृत्यू दर, जननीमृत्यू दर व अर्भकमृत्यू या घटकांच्या सुधारणेकरिता उपाययोजना सुचविणे. | महिला व बाल विकास विभाग / सार्वजनिक आरोग्य विभाग / आदिवासी विकास विभाग / सामाजिक न्याय विभाग | (अ) पाणलोट क्षेत्र विकास, वृक्ष लागवड, महिला बचत गट, सुधारीत शेती, दुग्ध व्यवसाय इत्यादी कार्यक्रम धुळे जिल्हयातील साक्री तालुक्यातील बारीपाडा येथील गावकऱ्यांनी राबविले. त्यामुळे तेथील आदिवासींचे स्थलांतर थांबले व कुपोषणची समस्या देखील चांगल्या रितीने हाताळली गेली. या धर्तीवर सामुदायिक विकासाचा कार्यक्रम तयार करावा व पोषण व आरोग्य विषयक समस्या असलेल्या राज्यातील काही जिल्हयातील काही तालुक्यांमध्ये "आदिवासी उत्थान कार्यक्रम - भाग २" म्हणून राबवावा.<br><br>(ब) कुपोषित बालकांमध्ये आदिवासी बालकांचे प्रमाण जास्त असुन अशा कुपोषित आदिवासी बालकांना पोषणाच्या नावावर आयुर्वेदिक औषधे, टॉनिक, तयार पदार्थ इ. देण्याऐवजी स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेली फळे व सकस आहार देणेबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. |
| ४ | आदिवासींकरिता उपलब्ध असलेल्या उपजिविकेची साधने व संधी यांचे जनजाती सल्लागार समितीने पुर्नविलोकन करावे. तसेच उपजिविकेची साधने व संधी यामध्ये आदिवासी समाज व मुख्य प्रवाहातील इतर समाज, यांच्यात असलेली विषमता कमी करण्याकरिता उपाययोजना सुचविणे. | आदिवासी विकास विभाग | आदिवासी उपयोजनेचे पुर्नविलोकन व मुल्यांकन करुन आदिवासींचा विकास परिणामकारकपणे करण्यासाठी सुधारणा सुचविणे व नविन उपक्रम सुचविणेसाठी एका तज्ञाची समिती स्थापन करावी. |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | राज्य शासन व केंद्र सरकारचे विविध कार्यक्रम व धोरणांची अंमलबजावणी करण्याकरिता असलेल्या प्रशासकीय यंत्रणेचे जनजाती सल्लागार समितीने पुनर्विलोकन करावे व त्यांची अंमलबजावणी अधिक परिणामकारक, पारदर्शक होण्याच्या दृष्टीने उपाययोजना सुचवाव्यात. | आदिवासी विकास विभाग | आदिवासी विकास विभागाच्या प्रशासकिय यंत्रणेचा तिन टप्प्यात आढावा घेण्यासाठी व यंत्रणेतील त्रुटी दुर करुन बळकटीकरण आणि सशक्तीकरण करण्यासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या एक सदस्यीय समितीने अहवाल सादर करावा. |
| ६ | आदिवासी उपयोजनेच्या राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय नियोजनाच्या घटकांचे जनजाती सल्लागार समितीने पुनर्विलोकन करावे व सदर नियोजन अधिक व्यवहारी, गरजेस अनुसरुन व आदिवासी समाजाच्या सहभागाने होण्यासाठी उपाययोजना सुचवाव्यात. | आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे / आदिवासी विकास विभाग | आदिवासी उपयोजनेत राबविण्यात येणा-या विविध योजनांचा एकत्रित विचार करुन त्याचा नियमित आणि ठराविक कालावधीत पुनर्विलोकन व मुल्यमापन करावे. तसेच प्रत्येक एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाने आदिवासींसाठी राबविण्यात येत असलेल्या कार्यक्रमांच्या प्रगतीचा विश्लेषणात्मक अहवाल तयार करावा. |
| ७ | आदिवासी समाजांमध्ये तसेच त्यांच्या स्थानिक स्वराज्य संस्थांतील प्रतिनिधींमधील क्षमता वाढीची गरज जनजाती सल्लागार समितीने जाणून घेतली पाहिजे. जेणे करुन वैधानिक आयुधांमार्फत व इतर योजनांमार्फत निर्माण होणाऱ्या संधींचा पुरेपुर फायदा घेऊ शकतील. तसेच सदर बाबींच्या व विकासात्मक उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता आदिवासी समाजास प्रशिक्षण देण्याबाबत जनजाती सल्लागार परिषदेने यंत्रणा सुचवावी. | ग्राम विकास विभाग / नगर विकास विभाग | याबाबतचा प्रस्ताव ग्राम विकास विभागाकडुन मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | जनजाती सल्लागार समितीने अशा कोणत्याही अभ्यासाची गरज सुचवावी, ज्यामध्ये आदिवासी समाजाच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे सशक्तिकरण इत्यादीशी संबंधीत प्रकरणांच्या मूल्यांकन व प्रभावी मुल्यमापनाचा अभ्यास समाविष्ट आहे. | आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे | आदिवासींचे होणारे हंगामी स्थलांतर थांबविण्यासाठी सर्वकष अभ्यास करुन कालमर्यादित उपाययोजना तयार करण्यासाठी अभ्यास गटाची स्थापना करावी. |
| ९ | बिगर आदिवासींनी, आदिवासींच्या जमिनी फसवणूकीने किंवा जबरदस्तीने बळकावण्याबाबतच्या प्रकरणांचे पुर्नविलोकन जनजाती सल्लागार समितीने करावे व आदिवासींचे भुधारणाचे अधिकार अबाधीत राहण्याकरिता उपाययोजना सुचवाव्यात. | महसूल विभाग / आदिवासी विकास विभाग | आदिवासींच्या जमिनीचे बिगर आदिवासींना होणारे हस्तांतरण रोखण्यासाठी आंध्रप्रदेशात आणि इतर राज्यात अस्तित्वात असलेल्या कायद्यांची तपासणी करुन महाराष्ट्र जमीन महसूल कायदा, १९६६ मध्ये योग्य तो बदल करण्यासाठी अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली प्रधान सचिव (आ.वि.) प्रधान सचिव (विधी व न्याय विभाग) आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे या अधिका-यांची समिती स्थापन करुन या समितीच्या अहवालावर निर्णय होईपर्यंत, यापुढे नवीन हस्तांतरांचा प्रस्ताव नोंदवू नये, या आशयाचे आदेश महसुल विभागाने काढावे. |
| १० | वरील सर्व बाबींचे पुर्नविलोकन करतांना काही नवीन नियम / अधिनियम करण्याची आवश्यकता भासल्यास जनजाती सल्लागार समितीने तसे सुचवावे. | सामान्य प्रशासन विभाग /आदिवासी विकास विभाग | महसूल व वन विभाग, ग्रामविकास विभाग, महिला व बालविकास विभाग, शालेय शिक्षण विभाग, आदिवासी विकास विभाग, कृषि विभाग, आरोग्य विभाग या विभागांकडून तलाठी, सर्व्हेअर, ग्रामसेवक, आंगणवाडी पर्यवेक्षिका, शिक्षक (शाळा / आश्रमशाळा), आदिवासी विकास निरिक्षक, कृषि सहाय्यक, पशुधन सहाय्यक, परिचारिका इत्यादी तत्सम |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | गट-क व गट-ड संवर्गातील कर्मचाऱ्यांमार्फत अनुसूचित क्षेत्रातील अनुसूचित जमातीच्या जनतेला सेवा / योजना उपलब्ध केल्या जातात. सदर सेवा / योजना उपलब्ध करतांना अनुसूचित क्षेत्रातील सेवा / योजना प्रत्यक्ष उपलब्ध करून देणारे व स्थानिक जनतेशी दैनंदिन संपर्क करणारे गट-क व गट-ड (तांत्रिक पदांसह) संवर्गातील विविध पदे विविध कारणांमुळे रिक्त राहणे, सदर पदांवर कर्मचारी कार्यरत असल्यास त्यापैकी काहीची कार्यालयातील उपस्थिती कमी प्रमाणात असणे किंवा काही कर्मचारी कामात पुरेसा रस न घेणे, तसेच स्थानिक आदिवासी बोलीभाषा त्यांना अवगत नसणे याबाबींचा विपरीत परिणाम सदर क्षेत्रात उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सेवा / योजनाच्या अंमलबजावणीवर होतो. त्यामुळे अनुसूचित क्षेत्रात सेवा / योजना उपलब्ध करून देण्यासाठी येत असलेल्या या व तत्सम समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी अनुसूचित क्षेत्रातील गट-क व गट-ड संवर्गातील पदे स्थानिकांमधुन भरण्यासाठी प्रचलित सेवाप्रवेश नियमांमध्ये त्या क्षेत्राच्या मर्यादेत दुरुस्ती करावी, अशी शिफारस मा.राज्यपाल महोदयांना त्यांच्या अधिकार क्षेत्रात घटनात्मक नियामक काढण्यासाठी करावी. |

## भाग : २

**जनजाती सल्लागार परिषदेच्या ४८ व्या बैठकीत समावेश करण्यासाठी मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मा.मंत्री (आ.वि.) व जनजाती सल्लागार परिषदेचे इतर सदस्य यांनी सुचविलेले विषय.**

| अ.क्र. | विषय | संबंधीत विभाग | अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | नेट व सेट च्या परीक्षेला बसण्यापूर्वी अनुसूचित जमातीचे वैधता प्रमाणपत्र आवश्यक करावे. कारण बोगस प्रमाणपत्राच्या आधारे गैर आदिवासी उमेदवार परिक्षेस बसण्यासाठी लागणाऱ्या गुणांची अट शिथील करुन मोठया प्रमाणावर गैर फायदा घेत असल्याचे निदर्शनास आले आहे. | सामान्य प्रशासन विभाग / सामाजिक न्याय विभाग / आदिवासी विकास विभाग | शैक्षणीक व व्यवसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश व सेवाप्रवेश देण्यापूर्वी अनुसूचित जाती व अनुसूचति जमातीचे वैधता प्रमाणपत्र अनिवार्य करण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा, व त्याबाबतचे सामाईक आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागाने करावी. |
| २ | अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना सिंचनासाठी देण्यात येणाऱ्या पाईपच्या योजनेमध्ये टाकण्यात आलेली बीपीएल ची अट काढण्यात यावी. कारण शेती असलेल्या व्यक्तींकडे बीपीएल चे कार्ड असेलच असे नाही. तसेच ऑईल इंजिनसाठी शासनाने ही अट यापूर्वीच काढलेली आहे. | आदिवासी विकास विभाग | (अ) दारिद्रयरेषेखालील अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना पाईप वाटप केले जातात. ही अट काढण्यात आली तर एकुण किती वित्तीय भार येईल ते तपासून बीपीएल ची अट काढण्याचा निर्णय ऑईल इंजिनच्या धर्तीवर करावा.<br><br>(ब) तो पर्यंत, ज्या लाभार्थ्यांची नावे दारिद्रयरेषेखालील यादीत (BPL) अंतर्भूत नाहीत, अशा लाभार्थ्यांना BPL साठी विहित उत्पन्नाच्या दाखल्याच्या आधारे लाभ द्यावा. |
| ३ | अनुसूचित जमातीवरील (आदिवासींवरील) होणारा अन्याय दूर करण्यासाठी केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यात देखील स्वतंत्र अनुसूचित जमाती आयोग स्थापन करण्यात यावा. | आदिवासी विकास विभाग | आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी भारतीय घटना व संविधानीक बाबी तपासून अनुसूचित जमातीकरिता स्वतंत्र आयोग स्थापन करणे व्यवहार्य आहे काय किंवा कसे याबाबत अभ्यास करुन अहवाल सादर करावा. |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | आदिवासी विकास योजनांचे अंदाजपत्रक (Budget) महाराष्ट्र राज्यात लोकसंख्येच्या प्रमाणात असते, हे जरी खरे असले तरी त्यात तरतूद केलेल्या अंदाजपत्रकीय रकमेच्या ६० टक्के रक्कम ही क्षेत्र विस्तार (Area Development) या कार्यक्रमाकरिता खर्च होते व ४० टक्के रक्कम ही वैयक्तिक लाभार्थी योजना (Individual Beneficiary Schemes) यावर खर्च होते. त्यामुळे आदिवासी विकासामध्ये अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे गेल्या ५० वर्षात आदिवासी विकासाचे पाहीजे ते दृष्य परिणाम दिसू शकले नाही. म्हणून याकरिता एक उपाययोजना म्हणून क्षेत्र विस्तार (Area Development) कार्यक्रमाअंतर्गत २५ टक्के पेक्षा जास्त रक्कम खर्च करण्यात येऊ नये, असे सुचवावेसे वाटते. | वित्त विभाग / आदिवासी विकास विभाग | (अ) आदिवासी विकास विभागासाठी राज्य योजनेच्या एकुण आकारमानाच्या सुमारे ९% एवढा नियतव्यय आदिवासी उपयोजनेकरिता उपलब्ध करुन देण्यात येतो. आदिवासी उपयोजनेकरिता उपलब्ध झालेल्या नियतव्ययापैकी ६० टक्के नियतव्यय जिल्हास्तरीय योजनांसाठी व ४० टक्के नियतव्यय राज्यस्तरीय योजनांसाठी उपलब्ध करुन देण्यात येतो. जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय योजनाद्वारे शिक्षणासाठी व आदिवासी वहुल क्षेत्रात मोठया प्रमाणात खर्च होत आहे. आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर फक्त वैयक्तिक लाभाच्या योजना राबविण्यात येतात.<br>वैयक्तिक व सामुहिक लाभाच्या योजना व त्याकरिता उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या तरतुदीच्या आढाव्यासाठी (TSP Review) प्रस्तावित तज्ञ समितीकडे हा मुददा तपासणीसाठी देण्यात यावा.<br><br>ब) आदिवासी उपयोजनेखाली जिल्हास्तरावरील योजनांकरिता असलेला ९० % च्या वर निधी योजना राबविणाऱ्या यंत्रणांना उपलब्ध केला आहे. मात्र जिल्हा स्तरावरील योजनांवर अपेक्षेपेक्षा कमी खर्च झालेला असल्यावर नाराजी व्यक्त करण्यात आली. मुख्य सचिवांनी सर्व संबंधीत जिल्हयांतील योजनांवरील खर्च वाढेल यादृष्टीने संबंधीत जिल्हा अधिकाऱ्यांबरोबर आढावा बैठक घ्यावी. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | क) राज्यस्तरीय योजनांसाठी करण्यात आलेल्या तरतुदींमध्ये कपात करण्यात येऊ नये व उर्वरित २० टक्के तरतुद वित्त विभागाने उपलब्ध करुन द्यावी.<br><br>ड) प्रकल्प अधिका-यांकडे नियोजन व्यवस्थेचा अभाव असल्याकारणाने जिल्हा स्तर व राज्य स्तरातुन प्राप्त होणारी तरतुदीच्या खर्चाच्या नियोजन व अंमलबजावणी विहीत कालमर्यादेत होत नसल्याकारणाने आदिवासी उपयोजना क्षेत्र असलेल्या प्रकल्प अधिकारी यांच्याकडे नियोजनाची प्रभावी यंत्रणा निर्माण करावी.<br><br>इ) जिल्हास्तरावरच पुनर्नियोजनाचे सर्व अधिकार प्रदान करावेत. सद्य:स्थितीत जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजनेंतर्गत पुनर्विनियोजन करण्याचे अधिकार जिहाधिकारी यांनाच आहेत. |
| ५ | महाराष्ट्राचे रहिवाशी असलेल्या व केंद्र सरकार मध्ये आदिवासी जमातीच्या दाखल्यावर नोकरी मिळालेली असल्यास त्यांना जातप्रमाणपत्र देण्याची बाब अनिवार्य करण्यात येऊन त्याशिवाय त्यांना सरकारी नोकरीत कायम करण्यात येऊ नये. अशी केंद्र शासनास विनंती करण्यात यावी. | महसूल विभाग / आदिवासी विकास विभाग | सदर मुद्दयावर बैठकीत चर्चा झाली नाही. |
| ६ | <u>**वन हक्क कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे.**</u><br>**अ)** मागील बैठकीतील वनहक्कांची माहिती सुधारित करुन पुनश्च सादर करणे. | महसूल व वन विभाग / आदिवासी विकास विभाग | अ) व्यवस्थापन समितीमार्फत सामुहिक वन हक्कांची अंमलबजावणी करावी. तसेच वन विभागात अधिक रोजगार उपलब्ध होण्यासाठी वन विभागाने पर्याय शोधावेत. तसेच |

| | | | |
|---|---|---|---|
| | **ब)** वनहक्क कायदयांतर्गत कमी क्षेत्र दिलेल्या आदिवासींना मागणीप्रमाणे क्षेत्र देणे.<br>**क)** सामुदायिक हक्काची कारवाईची सद्य:स्थिती.<br>**ड)** दळी, एकसाली प्लॉट नियमित करणे.<br>**इ)** वनगावांच्या विविध समस्या हाताळणे व त्यावर उपाययोजना निश्चित करणे. | | ग्रामसभेमध्ये स्वयंसेवी संस्थांना सहभागी करावयाचे झाल्यास त्यांच्यावर योग्य ती देखरेख व्यवस्था असणे आवश्यक आहे.<br><br>ब) वन हक्क कायदे (FRA) अंतर्गत उर्वरित प्रकरणे त्वरित निकाली काढावित.<br><br>क) सामुहिक वन हक्काची (CFR) जास्तीत जास्त प्रकरणे तयार करण्यासाठी प्रयत्न करावेत |
| ७ | आदिवासी सहकारी संस्थांचे सक्षमीकरण करण्याच्या दृष्टीकोनातून आवश्यक त्या उपाययोजना करणे. | सहकार विभाग | आदिवासी सहकारी संस्थांचे सक्षमीकरण करण्याच्या दृष्टीकोणातून आवश्यक त्या उपाययोजना करण्यासंबंधी मंत्रीमंडळाच्या विचारार्थ प्रस्ताव आणावा. |
| ८ | भिल्ल यांचे विकासाकरीता वैयक्तिक लाभाचे विशेष पॅकेज जाहिर करणे. | आदिवासी विकास विभाग | राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील (OTSP) भिल्ल समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी सुरवातीस किमान रु.२५.०० कोटी इतक्या निधीच्या वैयक्तिक व सामुहिक योजना तयार कराव्यात. |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचा दिनांक १५ जून, १९९५ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.४ रद्द करण्यात यावे. बिगर आदिवासी (बनावट प्रमाणपत्रधारक) कर्मचाऱ्यांना व अधिकाऱ्यांना अनुसूचित जमातीसाठी आरक्षित असलेल्या पदावरुन कमी करुन त्यांची मूळ जातीच्या प्रवर्गात सेवा वर्ग करण्यात यावी व आदिवासींच्या रिक्त जागी विशेष मोहिमेद्वारे भरती करण्यात यावी. वैधता प्रमाणपत्र असल्याशिवाय शासकीय सेवेत किंवा शिक्षण संस्थेत प्रवेश देण्यात येऊ नये. बोगस आदिवासी व्यक्तींना कोणत्याही परिस्थितीत संरक्षण किंवा सवलत देऊ नये.<br>त्याचप्रमाणे दि.१८/०५/२०१३ च्या शासन निर्णयाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात यावी. | आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे | अ) दि.१५/०६/१९९५ नंतर अनुसूचित जमातीच्या दाखल्याच्या आधारे ज्यांनी शासकिय सेवेत प्रवेश केलेला आहे, त्या संदर्भात मंत्री गटाची नियुक्ती केली आहे. त्या मंत्री गटाच्या अहवालावर शासनाने निर्णय घेवून सुमारे २०,००० एवढया आदिवासींसाठी आरक्षित व सध्या अतिक्रमीत असलेली पदे मोकळी करावीत व या जागा खऱ्या आदिवासींसाठी उपलब्ध कराव्यात.<br>ब) अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समितीने दिलेल्या निर्णयाविरुध्द उच्च न्यायालयाने निर्णय दिला असल्यास तो प्रत्येक निर्णय गुणवत्तेवर तपासुन अपिल दाखल केलाच पाहिजे. यासाठी चांगले वकिल लावुन कायदेशीर मार्ग भक्कम करण्याचे प्रयत्न केले पाहिजे. जेणेकरुन कायद्याचा गैर फायदा घेणाऱ्या खोट्या आदिवासींवर वेळीच आळा बसेल.<br>क) जात वैधता प्रमाणपत्र देतांना कागदोपत्री पुरावे, आप्तभाव व भौगोलिक परिस्थिती या सर्व बाबी कसून तपासाव्यात व त्यानंतरच जात वैधता प्रमाणपत्र देण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी.. |
| १० | **रिक्त पदांची भरती**<br>अ) आदिवासी उपयोजना क्षेत्रातील सर्व विभागाची रिक्त पदे भरतांना प्रादेशिक संवर्गा ऐवजी जिल्हा संवर्गानुसार अनुज्ञेय आरक्षण विचारात घेऊन पद भरती करणे. | सामान्य प्रशासन विभाग | अ) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधीसुचित जमाती (विमुक्त) जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि नागरीकांचा इतर मागास प्रवर्ग यामधील व्यक्तींसाठी लोकसेवामधील पदांमधील रिक्त जागांच्या आरक्षणाकरिता असलेला |

| | | | |
|---|---|---|---|
| | ब) तसेच रोजंदारी व तासिका पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत असणाऱ्या वर्ग-३ व वर्ग-४ कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेणे. | | २००४ च्या अधिनियमाप्रमाणे जिल्हानिहाय आदिवासींची लोकसंख्या निश्चित करुन त्याप्रमाणे भरती व्हावी.<br>ब) रोजंदारी व तासिका पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत असणाऱ्या वर्ग-३ व वर्ग-४ कर्मचाऱ्यांची सर्व विभागांची एकत्रित माहिती तयार करुन सामान्य प्रशासन विभागाने मंत्रीमंडळासमोर विचारार्थ ठेवावी. |
| ११ | अनुसूचित जमातीकरीता कोर्ट स्टॅम्प फी चे Notification कायम करणे. सदर निर्णय पूर्व लक्षी प्रभावाने लागू करणे | महसुल विभाग | दि.१/०४/२०१० ते दि.३१/०३/२०१४ पर्यंतचे अनु.जमातींकरिता कोर्ट स्टॅम्प फी ची रक्कम निर्लेखित करण्याची, तसेच दि.१/०४/२०१४ पासुन अनु.जमातींना कोर्ट स्टॅम्प फी मधुन सुट देण्याचे आदेश महसुल व वन विभागाने निर्गमित करण्याची कार्यवाही करावी. |
| १२ | ठाणे जिल्हयातील सुर्या प्रकल्प व इतर प्रकल्पातून मुंबई व मुंबई उपनगरात पाणीपुरवठा होतो. सदर प्रकल्प ठाणे जिल्हयातील आदिवासी भागात आहेत. स्थानिक आदिवासी गाव व पाडयांना पुरेसा पाणीपुरवठा होत नसल्याने लोकांचे प्रचंड हाल होतात. त्यामुळे स्थानिक गाव व पाडयांना शासनाने स्वामित्वनिधी / विशेष अनुदान देण्याची योजना सुरु करावी. | नगर विकास विभाग / जलसंपदा विभाग | विविध धरणामधून मुंबई महानगरपालिका, जलसंपदा विभाग व नगर विकास विभागाने स्थानिक आदिवासी गाव आणि पाडयांसाठी त्यांच्या गरजेनुसार पाणी आरक्षित करुन या गावातील लोकांना पाणी उपलब्ध करावे. |
| १३ | विधानसभा सदस्य व लोकसभा सदस्य जे अनुसूचित जमाती राखीव मतदार संघातून निवडणूक लढवितात त्यांना जातीच्या दाखल्यासोबत वैधताप्रमाणपत्र सक्तीचे करावे. वैधताप्रमाणपत्राची अट फक्त स्थानिक स्वराज्य संस्थांना लागू | सामान्य प्रशासन विभाग | सदर मुद्यावर बैठकीत चर्चा झाली नाही. |

| | | | |
|---|---|---|---|
| | आहे. त्यामुळे विधानसभा सदस्य (आमदार) व लोकसभा सदस्य (खासदार) यांना सुध्दा जातीचे वैधताप्रमाणपत्र निवडणूकीच्या नामनिर्देशनपत्र भरताना सक्तीचे करावे. यासाठी शासनाने केंद्र सरकार, केंद्रीय निवडणूक आयोग यांना शिफारस करावी व कायद्यात दुरुस्ती करण्यासंदर्भात विनंती करावी. | | |
| १४ | शासकीय आदिवासी आश्रमशाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याला वर्ग १ ली ते १२ वी च्या वर्गात शिकत असताना शाळेतच जातीचे वैधता प्रमाणपत्र देण्यात यावे. यासाठी विभागाने योजना मंजुर करावी. | आदिवासी विकास विभाग | आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी आयुक्त, आदिवासी विकास यांच्या सहाय्याने एक विशेष मोहिम घेऊन इ. १० वी , ११ वी , १२ वी वर्गात शिकत असलेल्या आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करावी. |
| १५ | शासकीय आश्रमशाळा इमारत बांधकामासाठी ज्या आदिवासी शेतकऱ्यांनी शासनाला जमिन दिली असेल. त्या शेतकऱ्यांच्या कुटुंबांतील एका वारसाला आदिवासी विकास विभागाच्या वर्ग-३ व वर्ग-४ सेवेत सामावून घेण्यात यावे व ही योजना पूर्वलक्षी प्रभावाने लागु करावी. | सामान्य प्रशासन विभाग / आदिवासी विकास विभाग | सदर मुद्यावर बैठकीत चर्चा झाली नाही. |
| १६ | सन २००८ मध्ये एक वर्षाकरिता निलंबित करण्यात आलेली एकाधिकार खरेदी योजना दि.२९ ऑक्टो. २०१३ पासुन राज्यातील ८ जिल्हयातील २९ तालुक्यांमध्ये पुर्ववत सुरु करण्यात आली आहे. | आदिवासी विकास विभाग | आदिवासी विकास महामंडळ यांनी एकाधिकार खरेदी योजनेमध्ये शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव मिळण्यासाठी सर्व अनुसूचित क्षेत्रात योग्य ती बाजार व्यवस्था निर्माण करावी. |
| १७ | पश्चिम खानदेशी मेहवाशी इस्टेट (प्रोपायटरी राईटस् ॲबॉलिशन) इ. रेग्युलेशन १९६१ रद्द करण्याबाबत. | आदिवासी विकास विभाग | सदर मुद्यावर बैठकीत चर्चा झाली नाही. |

**********